MHKO070007312010

<u>नियमीत दिवाणी दावा क्रं.१४३/२०१० मधील नि.क्रं.४० वरील आदेश</u>

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी नं.१ यांनी त्यांचे म्हणणेमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी नं.१ यांचे कथन असे की, दाव्याकामी त्यांनी त्याचे म्हणणे दाखल करित असताना काही खरी वस्तुस्थिती ही नजरचुकीने राहून गेलेली आहे. सदरची वस्तुस्थिती त्याच्या म्हणण्यामध्ये नमुद करणे अत्यावश्यक आहे. तरी त्याचे म्हणणेतील कलम ५ नंतर ५अ म्हणून पुढील मजकूर नमुद करणेत गरजेचे आहे.

**"५अ)** खरी वस्तुस्थिती खालीलप्रमाणे **-**

१) यातील गोपाळ यांचे जनक वडील कृष्णा भाऊ पाटील यांनी त्यांचा मुलगा गोपाळ यास दत्तू देसाई या व्यक्तीस दत्तक दिले. सदरचा दस्त जरी रजिस्टर झाला असला तरी त्या दत्तकपत्राची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधीह झालेली नाही. गोपाळ हा जनक वडीलांचे कडेच लहानाचा मोठा झाला. त्याची दत्तक घरण्याची नाळ कधीच जुळली नाही. दत्तक वडील यांनी देखील त्याबाबत दत्तक मुलास प्रेम आपुलकी कधीही दिली नाही. दत्तक मुलाचे नाव त्याचे इस्टेटीस आज अखेर लावले नाही. दत्तकपत्राप्रमाणे दत्तक मुलास त्याचे वाली वारस म्हणून सरकारी रेकॉर्ड सदरी व प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नाही. म्हणजे गोपाळ यांस जगजाहिर रित्या दत्तकपुत्र म्हणून स्वीकारले नाही.

२) वर नमुद कारणास्तव वादी यांनी कथन केलेल्या दत्तकपत्राचा कधीही अंमल झाला नाही याची पुरेपुर जाणिव वादी व त्यांचे पती यांना होती व आहे. याच कारणास्तव यातील वादी यांचे पतींनी मयत गोपाळ याचे नाव जनक वडील कृष्णा याचे मृत्यू पश्चात लावले होते व याच कारणास्तव आप्पासाहेब म्हणजे वादी हिचे पती यांनी दाव्यामध्ये कथन केले प्रमाणे घर नं.६८४ हया घर मिळकतीचे वाटप करुन दिले होते जे आज अखेर यातील प्रतिवादी नं.१ यांचे ताबेत आहे व मयत आप्पासाहेब व गोपाळ यांनी मयत कृष्णा यांचे वारस म्हणून स्वतःचे दोघांची नावाची नोंद केली या नोंदी फार वर्षापूर्वी झालेल्या आहेत. याबाबत वादीस

पुरेपूर कल्पना होती व आहे. त्यामुळे वादी हिने सदरच्या नोंदी झाल्या बाबत दावेत कोठेही स्पष्टपणे नमूद केलेले नाही.

३) यातील प्रतिवादी नं.१ याने महसूल खात्यास कोणत्याही प्रकारे हाताशी धरुन नोंदी करुन घेतलेल्या नाहीत. महसूल कायद्या अन्वये महसूल खात्यामध्ये ज्या काही नोंदी केल्या जातात त्या कायद्यास धरुन व नोंदीसाठी अर्ज करणा-या व्यक्तीचे नांवे अर्ज घेवून व त्याने दाखल केलेल्या कागदपत्राचे आधारे केल्या जातात याबाबत माहिती असून देखील वादीने सदरच्या खोटया कथनांचा आधार घेवून सदरचा दावा केला आहे.

४) वादी हिने कथन केले प्रमाणे भाऊ पाटील हे मयत झालेनंतर त्यांचे वारस म्हणून त्यांची मुले व नातवंडे यांचा त्यांचे मिळकती मध्ये हिस्सा होता व आहे. त्यामुळे सदरचा हक्क गोपाळ यांस जनक घरात प्राप्त झाले होते व आहेत. सदरचे हक्क मयत गोपाळ यांनी त्यांचे मृत्यू अखेर कोणत्याही प्रकारे संपुष्ठात आणलेले नव्हते व नाहीत. त्यामुळे मयत गोपाळ अथवा त्याचे वारस मयत भाऊ पाटील यांचे मिळकतीस हिस्सेपासून वंचित होत नव्हते व नाहीत. त्यामुळे वादी हिने अपूर्ण संदिग्ध कथनांचे आधारे सदरचा दावा केला असलेने तो सकृतदर्शनी फेटाळणेस पात्र आहे. ”

०३. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असलेने त्यामुळे मुळ म्हणणेचे स्वरुपात कोणताही बदल होणार नाही अथवा वादी यांचेवर अन्याय होणार नाही. यापूर्वीही सदरचे म्हणणे दाखल करतेवेळी प्रतिवादी यांनी त्यावेळेचे वकिलांना माहिती दिली त्यामुळे प्रस्तुत मजकूर म्हणणेमध्ये नमूद आहे या समजुती खाली होते, परंतू नजरचुकीने सदरचा मजकूर नमूद करणेचे राहून गेलेले होते. सदरची दुरुस्तीस परवानगी न दिल्यास प्रतिवादींचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. व प्रस्तुतची दुरुस्ती झालेस दावा गुणदोषावर चालणेस मदत होणार आहे. सबब, दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी प्रतिवादी यांनी विनंती केलेली आहे.

०४. वादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे नि.४१ वर सादर करुन अर्जातील कथने ही खोटी व लबाडीचे असल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत कामी मुद्दे निघून बरीच वर्षे झाली असून त्यानंतर वादीचा सरतपास हा माहे ७, २०१८ रोजी दिलेला आहे. वादीचा जबाब चालू झाला असल्याने कायद्याने कोणतेही दुरुस्ती मागता येत नाही. त्यामुळे असा विलंबाने व पुरावा चालू झाल्यानंतरचा दिलेला अर्ज चालणेस पात्र नाही. दावे कामी प्रतिवादींनी कैफियत

ही दि.४.१०.२०१० रोजी दिलेली आहे. त्या कैफियतीमध्ये कलम ३ मध्ये प्रतिवादींनी गोपाळ यांस ता.३१.५.१९५४ रोजी रजिस्टर दस्ताने दत्तक दिल्याचे विधान पूर्णपणे नाकारलेले आहे. तथापि, आता '५अ१' मध्ये त्याच्या विरुध्द कथने केली आहेत. तसेच '५अ२' मध्ये घर मिळकतीबाबत वेगळीच विधाने केली असून '५अ३' मध्ये महसुल नोंदीसाठी वेगळीच विधाने केली आहेत. तसेच '५अ४' मध्ये मुळ कैफियतीच्या विरोधी जावून जनक घराण्यात हक्क प्राप्त झालेत आशी परस्पर विरोधी कथने करत आहे. तसेच कैफियत कलम ५ मध्ये ग्रामपंचायत मिळकत नं.१६० हे घर एकत्र कुटूंबाचा उत्पन्नातून बांधलेले आहे. तसेच कैफियत कलम ६ मध्ये गट नं.२५८ व २५९ तसेच सि.स.नं.६८४ व ग्रामपंचायत मिळकत नं.१६० या मिळकती वादी प्रतिवादीच्या वडिलार्जित आहेत व त्यात वाटण्या झाल्या नसून प्रतिवादी हे दावा मिळकतीत सहहिस्सेदार आहेत अशी कथने केलेली आहेत. सदरची दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची नसून ती मुळ कथने बदलणारी आहे. अशापरिस्थीतीत सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा, अशी विनंती केली आहे.

०५. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला व प्रकरणातील कागदपत्रे पाहिली. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी यांने कैफियत ही दिनांक ४/१०/२०१० रोजी नि.१५ कडे दाखल केलेली आहे. तद्नतर वादी यांनी त्यांच्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.३४ हे दिनांक २५/०७/२०१८ रोजी दाखल केल्याचे दिसुन येत आहे. वादी यांचा प्रस्तुतचा दावा हा कब्जाचा व दरम्यानचे उत्पन्नासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी करु पाहात असलेली दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची नाही. परंतु प्रतिवादीने मागितलेली दुरुस्ती ही त्यांनी दिलेल्या मुळ कैफियतीमधील विधानाचे स्पष्टीकरण करणारी आहे. त्यामुळे प्रतिवादीने मागितलेली दुरुस्ती ही मुळ दाव्याशी विसंगत नाही किंवा वादी हा नवीन केस घेवून न्यायालयासमोर येत आहे असे म्हणता येणार नाही. प्रस्तुत अर्जान्वये प्रतिवादी हे त्याच्या कैफियतीमध्ये जी दुरुस्ती करु इच्छीत आहेत ती त्यांनी कैफियतीमध्ये घेतलेल्या बचावाच्या स्पष्टीकरणाच्या अनुषंगाने कायदेशीर तरतुदीबाबत असल्याचे दिसून येत आहे. दुरुस्ती अर्जाचा विचार करताना दुरुस्तीचा दाव्याच्या अंतिम गुणावगुणावर काय परिणाम होईल याचा विचार करणे आवश्यक नाही हे संमत न्यायतत्व आहे. उभय पक्षकारांमधील मुळ वादप्रश्न प्रस्तुत दुरुस्तीमुळे गुणदोषावर मिटण्यास मदत होणार असुन त्यामुळे मुळ वाद मर्यादीत राहून दाव्याचे स्वरुप मर्यादीत राहण्यास मदत होणार आहे. दुरुस्तीस मंजुरी दिल्यास दाव्यातील गुंतागुंत कमी होणार आहे. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादीमधील दाव्यांची संख्या वाढून अनेकविध होण्याची शक्यता आहे. प्रतिवादी

यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास केलेल्या विलंबामुळे वादीस झालेली गैरसोय खर्चाच्या माध्यमातून भरुन येण्यासारखी आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास कोणतीही नवीन केस अथवा दावा निर्माण होत नसुन दाव्याचे स्वरुप बदलत नाही. त्यामुळे वादींना नुकसान पोहोचत नाही.

०६. सबब, अनेकविध दावे न होता गुणदोषावर दावा चालवून मूळ वाद प्रश्न निर्णीत करण्याकरिता मी खालील आदेश पारित करतोः-

आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.१ यांनी वादी यांना र.₹१,०००/- इतका खर्च म्हणुन देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी नं.१ यांनी सदरची दुरुस्ती या आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांचे आत करणेची आहे.

सही/-

ठिकाणः-जयसिंगपूर.
दिनांकः-०४/०७/२०१९.

(विश्वास पां.शिंदे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर.